# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**रूपये:- १,८५,१४,८७,१५,०००/-**<br>**श्री. अनंत (बाळा) नर** |
| (१) | १७१ | १०० | कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयासह रत्नागिरी जिल्हयात काजू उत्पादकांसमोर दरवर्षी पाऊस, ढगाळ वातावरण,अवकाळी पाऊस,वादळी वारे,आदि नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागणे,त्यातच काजू बी चे दर, आयात शुल्क , पीक परतावा अशा समस्या असतांनाच आता काजू बी आणि बोंडू खा-या किडींचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव काजू पिकांवर होत असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, यावर्षी या किडीमुळे काजू बांगांमध्ये थैमान घातले असल्याने काजू उत्पादकांमध्ये पसरलेले घबराटीचे वातावरण,किडीच्या प्रतिबंधाकरिता किटकनाशकांची फवारी करुनही कीड नियंत्रणात आलेली नसणे,परिणामी काजू बोंडाचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून काजु उत्पादन शेतक-यांना तात्काळ पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना . |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (२) | २६८ | १० | राज्य सरकारने 2024 च्या खरीप हंगामात छ.संभाजी नगर, लातूर, परभणी, जालना, बीड आदि जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या पीक विमा योजनेत सुमारे 350 कोटी रुपयाचा पीक विमा घोटाळा झाल्याचे निदर्शनास येणे. राज्यातील ५ ते ६ जिल्ह्यात मशीद, मंदिर, एनए प्लॉट किंवा शासकीय जमिनीवर विमा उतरविल्याचे लक्षात आल्यामुळे सर्व महा-ईसेवा केंद्रावर फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई करण्याचे जिल्हाधिकारी यांनी निर्देश देऊनही अद्याप यावर कोणतीच कारवाई करण्यात न येणे. तसेच बीड जिल्ह्यात बोगस पीक भरण्याचे प्रकार, क्षेत्र कमी दाखविणे, शेतात नसलेले पीक दाखविणे, परळी तालुक्यात 15 ते 17 शेतकऱ्यांच्या नावाने एकापेक्षा अधिक अर्ज भरल्याचे आढळून येणे. अशा प्रकारे एकट्या बीड जिल्ह्यातच 89 हजार 69 हेक्टरवर बोगस विमा नोंदविण्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आल्याचा प्रकार उघडकीस येणे. यामुळे सहा जिल्ह्यात पीक विमा भरलेल्या सर्व अर्जांची चौकशी केल्यास पीक विमा घोटाळ्याची सुमारे ५ हजार कोटीहून अधिक रुपयाचा आर्थिक घोटाळा झाल्याचा धक्कादायक माहिती उघडकीस येण्याची शक्यता असणे. यामुळे सदरहू पीक विमा घोटाळ्याची व्याप्ती विचारात घेता शासनाने सदरहू प्रकरणी एसआयटी द्वारे चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | २६७ | १०० | शासनाने फळ पिकांना विमा संरक्षण मिळणेसाठी कृषी विभागाकडून फळपीक विमा योजना राबविण्यात येत असताना या योजने अंतर्गत शासनाकडे दाखल झालेल्या ७३ हजार ७८७ अर्जापैकी ४५ हजार अर्जांची छाननी केली असता यामध्ये प्रत्यक्षात फळबागा लागवड न करता १० हजार ५०० शेतकऱ्यांनी फळपीक विम्यासाठी बोगस अर्ज केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (४) | १६० | १० | राज्यातील शेतकऱ्यांना विविध समस्येचा सामना करावा लागत असतो, त्यामुळे ऐन पावसाळ्यात पेरणी करण्याच्या वेळी बियाणे, खते, कीटकनाशके, शेतीसाठी लागणारे विविध औजारे, शहरातील विविध ठिकाणे जाऊन आणावे लागते त्यामुळे त्यांना मानसिक ,शारीरिक त्रास सहन करावा लागतो त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांचा होणारा त्रास,वेळ कमी होऊन त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी राज्यातील विविध भागात,तालुक्याच्या ठिकाणी बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी मॉल उभारणे साठी व एकाच छताखाली, विविध, बियाणे, कीटकनाशके, अवजारे व शेतीसाठी लागणारे सर्व साहित्य मिळण्यासाठी सर्वत्र दुकाने (मॉल)उघडण्याबाबत शासनाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | १६१ | १० | उमरेड येथील शेतकरी दर वर्षी प्रधानमंत्री पीक विमा योजना यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपल्या पिकाचा पीक विमा काढणे, पंरतू नैसर्गिक आपत्ती, जास्त प्रमाणात पाऊस किंवा कमी प्रमाणात पाऊस झाल्यावर शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटाला सामोरे जावे लागणे, त्यामुळे अशा आपत्ती मध्ये पीक विमा खाजगी कंपन्या आपला कारभार करून पाहिजेत तेवढ्या प्रमाणात नुकसान भरपाई विमाची रक्कम दिली जात नसणे, त्यामुळे शासनाने याप्रकरणी पिक विमा कंपन्या यांच्यावर कडक कारवाई करुण शेतकऱ्यांना पिक विमा ची रक्कम वितरीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६) | १६२ | १० | उमरेड येथील कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी यांची विविध पदे अनेक वर्षापासून भरली गेली नाहीत, त्यामुळे ग्रामीण भागातील कृषी विभागाच्या विविध योजना सामान्य शेतकरी जनतेत पोहचत नाहीत, तसेच विभागाच्या कर्मचारी अभावामुळे शेतकऱ्यांची विविध कामे प्रलंबित आहेत त्यामुळे शासनाने तातडीने उमरेड येथील कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची विविध रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४१५, कृषिविषयक संशोधन व शिक्षण**<br>**रूपये:- २१,२०,३१,८२,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (७) | ३२१ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली या तालुक्यात ९९ टक्के धान उत्पादक शेतकरी व शेतमजूर वास्तवास आहेत. शेतकऱ्यासह त्यांच्या पाल्यांना शेती विषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, बारमाही उत्पादन घेऊन आर्थीक उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी कृषीतंज्ञाकडून मागदर्शन मिळण्याकरिता ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली येथे कृषीभवनाची मागणी लोकप्रतिनिधीनी केली असून त्याप्रमाणे लेखी वेदन सुध्दा दिले आहे. त्यामुळे या तीनही तालुक्याच्या ठिकाणी कृषीभवन बांधकाम करण्याचा अंदाजपत्रकासह रितसर प्रस्ताव जिल्हा कृषी अधिक्षक, कृषी विभाग चंद्रपूर यांनी अप्पर मुख्य सचिव कृषी विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे निधीसह प्रशासकीय मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. मात्र गेल्या दोन वर्षापासून सदर प्रस्ताव मंजूरी विना संबधित विभागाकडे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यात तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामुळे ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली येथील कृषीभवन बांधकाम करण्याच्या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मंजूरी मीळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ३२२ | १० | अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमूख कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामूळे प्रशासकीय कामकाज करीत असतांना अनेक अडचणी निर्माण होत असणे, त्यामूळे अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमूख कृषी विद्यापीठाचे विभाजन करून नवीन विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे डॉ. बी.व्यंकटेश्वरलू यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांचा समावेश असलेली समिती गठीत केली असणे. या समितीने विदर्भातील चंद्रपूर, सिंदेवाही, मूल, नागपूर या ठिकाणी दौरा करून भौगोलीक परिस्थितीची पाहणी करून अनेक तज्ञांचा मत घेवून केलेल्या मूल्यांकनाचा अहवाल दिनांक २७ जानेवारी २०१६ रोजी शासनाकडे सादर केलेला असून त्यात अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमूख कृषी विद्यापीठाचे विभाजन नवीन विद्यापीठ स्थापन करावे असे मत सादर केलेल्या अहवालात नमूद केले असणे, तसेच मुल्याकन समितीसह केळकर समितीने सिंदेवाही येथे नवीन कृषी विद्यापीठ स्थापन करावे असे मत सादर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | केलेल्या अहवालात नमुद असतांना सुध्दा डॉ.पंजाबराव देशमूख कृषी विद्यापीठाचे विभाजन करून सिंदेवाही येथे नवीन विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**रूपये:- २०,६५,७४,५६,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (९) | ३०२ | १०० | पालघर जिल्ह्यातील डहाणू व तलासरी तालुक्यातील नागरिकांना दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे, जनावरांना उपलब्ध चाऱ्याची कमतरता भासणे, जनावरांचे लसीकरण वेळेत न होणे, दुधाला अत्यल्प दर मिळणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१०) | २८७ | १० | भंडारा जिल्हयात साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात पशुवैद्यकीय दवाखान्याच्या स्वतंत्र इमारती उपलब्ध नसणे, पशुवैद्यकीय व कर्मचाऱ्यांचे पदे रिक्त असणे, त्यामुळे जनावरांवर रोग प्रतिबंधक उपाययोजना करण्यास अडचण निर्माण होणे, पशुपालकांच्या दारात जनावरांना सखोल वैद्यकीय सेवा मिळावी आणि पशुपालकांमध्ये पशुसंवर्धनाबाबत जागरुकता वाढावी, जनावरांचे आजार ओळखावेत आणि लसीकरण व्हावे यासाठी गावपातळीवर पशु आरोग्य शिबीरांचे आयोजन न होणे, साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात अत्याधुतिनक मत्स्य बीज केंद्र व प्रशिक्षण केंद्र उपलब्ध नसणे, त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील मच्छिमार बांधव हे विविध योजनेंपासून वंचित असणे, तालुकास्तरावर शासकीय दुग्ध संकलन केंद्र उपलब्ध नसणे, त्यामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०४, दुग्धविकास**<br>**रूपये:- २,३१,०६,७५,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (११) | २७१ | १०० | भारतात दुध आणि दुग्धजन्य पदार्थांची सर्वात मोठी बाजारपेठ असलेली मुंबईची बाजारपेठ गुजरातच्या अमूल कंपनीने वर्चस्व निर्माण केल्याने राज्यातील महानंद व आरेसह अन्य दुध संस्था डबघाईला येऊन बंद होण्याचे संकट निर्माण झाले आहे. मुंबईत दररोज होणाऱ्या दुध विक्रीत एकूण ६० लाख लिटरपैकी सर्वाधिक १६ लाख लीटर दूध तर राज्यात एकूण २० लाख लीटर दुधाचे वितरण एकट्या अमूल या दुध संस्थेकडून करण्यात येत आहे. यामुळे राज्यातील दुध संघांमध्ये अस्वस्थता निर्माण होऊन डेअरी उद्योगापुढे तग धरण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अमूलच्या वर्चस्वामुळे २० वर्षापूर्वी २५ लाख लिटर दूध विक्री करणारी आरे दूध संस्था आज केवळ ३० हजार लीटर दूधाची विक्री करीत असून तर एकेकाळी १२ लाख लीटर दूध विक्री करणारी महानंद हि संस्था आज रोजी केवळ ७० हजार लीटर दूधाची विक्री करीत असल्याने या दोन्ही संस्था आर्थिकदृष्ट्या तोट्यात येऊन बंद होण्याच्या मार्गावर आहे. यामुळे या दोन्ही शासकीय दुध संस्थेमध्ये काम करणाऱ्या हजारो कर्मचारी आणि दुध उत्पादक करणारे लाखो शेतकरी कुटुंबांवर बेकारीचे व उदरनिर्वाहाचे आर्थिक संकट कोसळले आहे. महानंदला अमूलच्या धरतीवर सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने 5 वर्षासाठी राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळाकडे (एन.डी.डी.बी) 253 कोटी 57 लाख रुपये इतका निधी भागभांडवल स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येऊन महानंद ही संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने केलेली कार्यवाही ही अत्यंत नगण्य स्वरुपात केली असल्याने त्याचा फारसा परिणाम दिसून येणार नसल्याने राज्य शासनाने अमूलच्या धरतीवर एकच ब्रँण्ड विकसीत करुन राज्यातील दूध उत्पादक शेतकरी, दूध डेअरीमधील कर्मचारी आणि दूध वितरण कर्मचारी यांना न्याय देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०५, मत्स्यव्यवसाय**<br>**रूपये:- ४,२४,४२,८७,०००/-**<br>**श्री. हारुन खान** |
| (१२) | २२४ | १०० | मुंबई शहरात वर्सोवा गाव हे मासेमारीसाठी प्रसिध्द असून त्या ठिकाणी खाडीतील गाळ काढणे, सुसज्ज मासेमारी बंदर उभारावे, अशी तेथील कोळीबांधवांकडून होत असलेले वारंवार मागणी, याकरिता सन २०१९ मध्ये ३३९ कोटी मंजूर देखील कामास सुरुवात न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (१३) | ३१० | १०० | पालघर जिल्ह्यातील सुमारे १५ ते २० हजार आदिवासी खलाशी बांधव गुजरात राज्यातील बंदरावर कामाला जाणे, स्थानिक ठिकाणी मत्स्यपालन करिता पोषक वातावरण निर्मिती न होणे, यामुळे स्थानिकांच्या उत्पन्नात घट होणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (१४) | २७० | १०० | राज्य शासनाने 1995 मध्ये (30 वर्षापूर्वी) 20 हजार तलावात मासेमारीचा व्यवसाय करण्यासाठी कंत्राट दिलेल्या व्यक्ती व खाजगी संस्थांनी अब्जावधी रुपये उत्पन्न घेऊनही सदरहू संस्थांनी 30 वर्षात शासनास एक रुपयाचेही महसूली उत्पन्न न देता कोट्यावधी रुपये महसूलाचे आर्थिक नुकसान केल्याची धक्कादायक माहिती उघडकीस येणे, सदरहू प्रकरणात खाजगी व्यक्ती, कंपन्या, संस्था यांनी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मत्सव्यवस्या विभागाचे संबंधित अधिकारी यांचेबरोबर आर्थिक संगनमत करुन गेली ३० वर्षापासून कोट्यावधी रुपायांचे शासनाचे नुकसान केले, सदरहू तलावांचे कंत्राट दर पाच वर्षांनी नुतणीकरण करणे आवश्यक असताना तसे न करता कंत्राटदार आजही हजारो तलावांमधून किती उत्पादन मिळते याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसणे. सदरहू तलावाचे मासेमारीचे कंत्राट घेणारी व्यक्ती तसेच कोणत्या संस्थांना देण्यात येणे, ३ दशकानंतर हे कंत्राट कोणाच्या नावे असणे, नेमके ते कंत्राट कोण चालवित आहे आणि त्यातून किती उत्पन्न कंत्राटदारास मिळत आहे तसेच शासनास त्यातून किती उत्पन्न प्राप्त होत आहे याबाबतची कोणतीही माहिती राज्य शासनाकडे उपलब्ध नसणे, सदरहू प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन यात शासनास झालेला लाभ-तोटा याबाबतची सखोल चौकशी करुन यातील दोषींवर शासनाने कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१५) | १४७ | १० | मुंबई शहर व उपनगराला अरबी समुद्र किणारा लाभला असणे, अरबी समुद्रामध्ये कारगो जहाजाने श्री.हेमदीप हरिषचंद्र टिपरी, अध्यक्ष, दर्यादिप मच्छिमार सहकारी संस्था, मढ, कोळीवाडा, मालाड (पश्चिम),मुंबई याच्या बोटीला दिनांक 29 डिसेंबर, 2024 रोजी वा त्यासुमारास धडक दिली असणे, त्या अपघातात बोटीचे रु.20 लाख रुपयाचे नुकसान झाले असणे, बोटीला तळपशा बंदरावर दि.29 डिसेंबर,2024 रोजी पंचनाम करण्यात आला असणे, पंचनाम्यानुसार बोटीचे व इतर बाबीचे रु.18.55 लाख ऐवढे नुसान झाल्याचे नमूद केले असणे, मात्र प्रत्यक्षात 20 लाखाचे नुकसान झाले असणे, संबंधितांना रु. 20 लाखाची आर्थिक मदत देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीने मा.मुख्यमंत्री, मत्स्यव्यवसाय मंत्री व आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई यांच्याकडे दिनांक 3 जानेवारी,2025 रोजी वा त्यासुमारास केली असणे, मात्र संबंधितांना अद्याप आर्थिक मदत मिळाली नसणे, याबाबत शासनाने दखल घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” |
| (१६) | १४८ | १० | मढ कोळीवाडा, वटार गल्ली, मालाड पश्चिम, मुंबई येथील समुद्र किना-यावर चौथरा बांधला असणे, मात्र सदरच्या चौथ-यामुळे मासळी धक्यावर उतरविणे धोक्याचे व अडचणीचे झाले असणे, सदरच्या धक्यावर मासळी उतरु शकत नसणे, मासळी उतरविण्यासाठी शासनाने ७ मिटर रुंद, ५० मिटर लांबीचे दोन रॅम्प बनवून देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे तसेच मढ वटारपाडा येथील जागेवर मासळी सुकविणे व नौका शाकरण्यासाठी असलेल्या सिमेंट कॉंक्रीट ओटयावरील शेडचे नुतनीकरणे करणे, सदरची शेड मोडकळीस आली असणे, सदरच्या शेडच्या क्षेत्रफळास वाढ करुन त्या शेडची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे त्याचप्रमाणे नवीन जाळी उभारण्याची गरज असणे, सिमेंट कॉंक्रीट |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ओटयावरील रात्री व अपरात्री कामासाठी यावे लागत असणे, त्यासाठी २४ सोलार स्ट्रिट लाईट बसवून देण्याची नितांत गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | १५२ | १० | सिल्वर बिच, मढ (ता. बोरीवली ) मालाड (पश्चिम ) मुंबई येथील विविध मच्छीमारांसाठी प्रस्तावित कामांना मान्यता मिळाली नसणे, प्रशासकीय मान्यता देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, तसेच उत्तरेकडीत बाजूस पदपथ निर्मिती करण्याची गरज असणे व इतर अनुषंगिक काम घेत नसणे, सदरची सर्व कामांना मत्स्यव्यवसाय विभागची प्रशासकीय मान्यता देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | १५४ | १० | मुंबई पश्चिम उपनगरे व कोकण किनार पट्टीत विविध मच्छिमार बांधवाच्या सोयायटया असणे, अनेक मच्छिमार सोसायटयांना डिझेल परताव्याची रक्कम मिळाली नसणे, डिझेल परताव्याची सुमारे 150 कोटी रक्कम शासनाकडे थकबाकी असणे, सदरची रक्कम तातडीने मिळण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, परताव्याची रक्कम न मिळाल्यामुळे मत्स्यव्यवसाय धोक्यात आला असणे, मच्छिमार संस्थांची डिझेल परताव्याची प्रकरणे सहाय्यक मत्स्यव्यवसाय अधिकारी यांच्याकडे प्रलंबित असणे, परिणामी मच्छिमार संस्थाना विविध आर्थिक अडचण निर्माण झाली असणे, संस्थाना 100 टक्के डिझेल परतावा अदा करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | १५५ | १० | तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ ( O.N.G.C.) या कंपनी मार्फत सेस्मिक सर्वेक्षण करण्यात येत असणे, त्यामुळे मच्छिमारांचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असणे, मात्र मच्छिमार बांधवांना आर्थिक लाभ व नुकसान भरपाई मिळत नसणे, मच्छिमारांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबतचे सर्व समावेशक धोरण ठरले नसणे, शासनाने ओ.एन.जी.सी.चा महामंडळाला व केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्थेला धोरण ठरविण्यात यावे, असे निर्देश दिले असणे, केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्थेनने (C.M.F.R.I.) मच्छिमारांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत सर्वेक्षण केले असणे, तसेच संस्थेने सर्वेक्षण अहवाल ओ.एन.जी.सी. कंपनीला सादर केला असणे, मात्र मच्छिमार बांधवाना आर्थिक नुकसान भरपाई मिळाली नसणे, नुकसान भरपाई मिळण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | १५६ | १० | ''मढ मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, लि. शंकुतला बर्फ कारखाना, मढ कोळीवाडा, मुंबई या संस्थेच्या सभासदाच्या IND-MH-MM-6708 श्री लक्ष्मी नारायण या मासेकारी नौकेला दि.३ मार्च,२०२५ रोजी पहाटे ३.०० वा.च्या सुमारास अपघात झाला असणे, श्री लक्ष्मी नारायण मासेमारी नौकेला मालवाहू जहाजाने धडक दिली असणे, सदरच्या अपघातात मासेमारी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | बोटीचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असणे, सदरची मासेमारी नौका GPS 19-41-197N72-27-644E येथे मासेमारी करीत असणे, श्री लक्ष्मी नारायण नौकेचा पंचनामा झाला असणे, मात्र अद्याप नुकसान भरपाई मिळाली नसणे, नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई